**पत्र** जा.क्र.कृआआ/एनएमएसए/आरएडी/मासु/३५९/२०१४
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे -४११००५,दिनांक : २०/०६/ २०१४

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)**

**विषय : राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान(NMSA) अंतर्गत -**

कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) घटकाच्या सन २०१४-१५ मध्ये

अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना निर्गमित करणेबाबत...

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्रमांक शाशेअ-२०१४/ प्र.क्र.८६/४-अ,
दिनांक १५ एप्रिल २०१३
२) कृषि व सहकार विभाग,भारत सरकार यांचे पत्र क्र.५-३/२०१४-
आरएफएस-**III**, दि.२८/०५/२०१४

केंद्र शासनाने शाश्वत कृषि उत्पादकतेसाठी सन-२०१४-१५ पासून राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन अभियान (NMMI), राष्ट्रीय सेंद्रिय शेती प्रकल्प (NPOF), राष्ट्रीय मृदा आरोग्य व सुपीकता व्यवस्थापन प्रकल्प (NPMSH&F) आणि कोरडवाहू शाश्वत शेती विकास कार्यक्रम (RADP) या योजनांचे एकत्रिकरण करून हवामान बदलाशी सुसंगत कृषि तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान (NMSA) कार्यान्वित केले आहे. त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना (operation guidelines) केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या आहेत. तसेच संदर्भ क्रमांक २ वरील पत्राव्दारे प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानात **कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD)** , **शेती जलव्यवस्थापन (OFWM), मृदा आरोग्य व्यवस्थापन (SHM)** व **हवामान बदल व शाश्वत शेती रचना, सनियंत्रण आणि संजालन (CCSAMMN)** या चार घटकांचा समावेश करण्यात आला आहे. हे चारही घटक राष्ट्रीय शाश्वत शेती अंतर्गत परंतु स्वतंत्रपणे राबविण्याच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमधून सूचित केले असून, प्रत्येक घटकासाठी स्वतंत्र निधी प्राप्त होणार आहे. त्याप्रमाणे प्रत्येक घटक स्वतंत्रपणे राबविण्यात येणार आहे.

जिल्हा स्तरावर सदर अभियान जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत राबविण्यात येणार आहे. त्यासाठी संदर्भिय शासन निर्णयान्वये अभियानाच्या अंमलबजावणी सनियंत्रणाकरीता

जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा अभियान समिती (DMC) स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये अशासकीय संस्था प्रतिनिधी व शेतकरी प्रतिनिधी यांची नियुक्ती करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.त्यानुसार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मा.जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने अशासकीय संस्था आणि शेतकरी प्रतिनिधींची नियुक्ती समिती सदस्य म्हणून करावी.

अभियानातील प्रत्येक घटकासाठी स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येणार असून, **कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD)** घटकाच्या मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

## १) प्रस्तावना :

पर्यावरण, कृषि उत्पादकता आणि लाखो ग्रामीण कुटुंबाच्या उपजिविकांच्या दृष्टीने कोरडवाहू कृषि उत्पादन असणा-या क्षेत्रास महाराष्ट्रात विशेष महत्व आहे. राज्याच्या उत्पादक जमिनीपैकी / क्षेत्रापैकी ८३ टक्के क्षेत्र हे कोरडवाहू आहे.

कोरडवाहू शेती ही अत्यंत जोखमीची व गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. तथापि, या क्षेत्रावर लक्ष केंद्रित केल्यास कृषि उत्पादनात मोठी वाढ साध्य करता येईल. कोरडवाहू क्षेत्रामध्ये हमखास सिंचन सुविधा उपलब्ध नसल्यामुळे हे क्षेत्र प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे या क्षेत्रात उपलब्ध पाण्याचा किफायतीशीर वापर करण्यासाठी मूलस्थानी जलसंधारण, विकेंद्री पध्दतीने पाण्याचा साठा करणे आणि साठविलेल्या पाण्याचा कार्यक्षम आणि परिणामकारक वापर करण्यासाठी सूक्ष्म सिंचन पध्दतीचा वापर करणे, या बाबींचा प्राधान्याने अवलंब करणे आवश्यक आहे.

एकात्मिक शेती पध्दतीतून कृषि क्षेत्राचा सर्वांगीण विकास व कृषि आधारित पूरक उद्योगधंद्याची योग्य सांगड घातल्यास उत्पादकतेत वाढ करता येणे शक्य होईल. तसेच हवामानातील अनपेक्षित बदलामुळे होणारे नुकसान कमी करता येईल. यामुळे कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) हा घटक राज्यासाठी महत्वाचा आहे.

सन २०११-१२ पासून राज्यात राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY) अंतर्गत कोरडवाहू शाश्वत शेती विकास कार्यक्रम (RADP) राबविण्यात येत होता. सन २०१४-१५ पासून या योजनेत

सुधारणा करुन राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत (NMSA) कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) हा घटक राबविण्यात येणार आहे.

## २) उद्देश :-

१) शेतक-यांच्या उत्पादकतेत शाश्वत वाढ करून नवीन उपजिविकेच्या साधनांची उपलब्धता करणे व त्याआधारे त्यांचे जीवनमान उंचावणे.

२) निरनिराळ्या एकात्मिक शेती पध्दतींचा अवलंब करून दुष्काळ, पूर व हवामानातील अनपेक्षित बदलामुळे होणारे नुकसान कमी करणे.

३) अद्ययावत कृषि तंत्रज्ञानाचा वापर करून कृषि उत्पादन वाढविणे व शाश्वत रोजगार उपलब्ध करणे.

४) कोरडवाहू क्षेत्रातील कृषि उत्पादनातील जोखीम कमी करून शेतक-यांचा कोरडवाहू शेतीबाबत आत्मविश्वास वाढविणे.

## ३) अंमलबजावणी धोरण :-

१) बहुवार पीक पध्दती, पीक बदल, आंतर पीक पध्दती, यांचा वापर तसेच फळपिके, पशुधन, वनिकी मधमाशीपालन इ. शेतीपध्दतींचा समावेश करून शेतक-याला शाश्वत उत्पन्न देण्याबरोबरच नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यास सक्षम करणे.

२) नैसर्गिक संसाधन तसेच म.गां.रा.ग्रा.रो.ह.यो. राष्ट्रीय कृषि विकास योजना, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान व विविध पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यक्रमातून निर्माण झालेल्या संसाधनांच्या क्षमतेचा प्रस्तावित एकात्मिक शेती पध्दतीस स्थैर्य देण्यासाठी सुयोग्य वापर करणे. **(Watershed Plus Framework)**

३) कोरडवाहू क्षेत्र विकास घटकांतर्गत शेतक-यांचा सहभाग वाढविणे व भविष्यात व्यापक क्षेत्रावर हा घटक राबविण्याच्या दृष्टीने समूह क्षेत्र आधारित **(Cluster based approach)** धोरण राबविणेकरीता प्रत्येक प्रकल्पाचे क्षेत्र किमान ३०० हेक्टर राहील.

४) प्रकल्प क्षेत्रामध्ये माती परिक्षण अनिवार्य आहे. तसेच कमीतकमी २५% शेती पध्दती क्षेत्रावर शेती जलव्यवस्थापन **(OFWM)** हा घटक राबविणे आवश्यक आहे.

## ४) कार्यक्षेत्र :-

कोरडवाहू क्षेत्र विकास **(RAD)** घटकामध्ये राज्यातील सर्व जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने हमखास सिंचनाखाली न येणा-या क्षेत्रामध्ये हा घटक राबविला जाणार आहे.

## ५) प्रकल्प निवड :-

५.१) कोरडवाहू क्षेत्र विकास **(RAD)** घटकाच्या अंमलबजावणीसाठी समूह आधारित प्रकल्प (**Cluster Based approach)** हे धोरण स्वीकारले आहे. यामध्ये प्रत्येक उपविभागातून कमीत कमी ३०० हेक्टरचा एक प्रकल्प (Cluster) या राज्यात प्रमाणे ९० प्रकल्प निवडावयाचे आहेत. प्रकल्पासाठीचा निधी त्याच वर्षीमध्ये पूर्ण खर्च करावयाचा असल्याने, प्रकल्प निवडताना प्रकलसाठीची पूर्ण रककम खर्च होईल अशा प्रकारे क्षेत्र व लाभार्थ्यांची निवड करावी. प्रकल्प क्षेत्र शक्यतो एकाच गावात घ्यावे परंतु अपवादात्मक परिस्थितीत प्रकल्पासाठी लगतच्या दोन गावांची निवड करता येईल.

५.२) ज्या गावामध्ये यापूर्वी **कोरडवाहू शाश्वत शेती विकास कार्यक्रम (RADP)** व **कोरडवाहू शेती अभियान** कार्यक्रम राबविला आहे, अशा गावाची निवड या प्रकल्पासाठी करू नये.

५.३) उपविभागात वरीलपैकी कोणतीही योजना राबविलेली नाही अशा तालुक्याची प्रथम निवड करावी. जर उपविभागातील सर्व तालुक्यात वरीलपैकी योजना राबविलेल्या असतील तर रोटेशन पध्दतीने तालुक्याची निवड करावी.

## ६) लाभार्थी निवड :-

६.१) हमखास सिंचनाची सुविधा नसलेले शेतकरी प्राधान्याने निवडावेत

६.२) अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना प्राधान्य द्यावे.

६.३) कोरडवाहू क्षेत्र विकास **(RAD)** घटकांतर्गत किमान ५० % निधी १ व २ येथे नमुद लाभधारकांवर खर्च करण्यात यावा. या लाभधारकांमध्ये किमान ३० % महिलांचा समावेश असावा.

६.४) प्रस्तावित निधीच्या १६% व ८% किंवा अनु.जाती / जमाती यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अनुक्रमे अनु.जाती व अनु.जमाती या प्रवर्गासाठी तरतूद करण्यात यावी.

६.५) लाभार्थी हा सध्याच्या प्रचलित पीक पध्दतीमध्ये बदल करून एकात्मिक शेती पध्दतीतील बाबी राबविण्यास तयार असला पाहीजे.

## ७) लाभार्थी अनुदान :-

७.१) कोरडवाहू क्षेत्र विकास **(RAD)** घटकांतर्गत प्रत्येक शेतकरी कुटुंबास २ हेक्टर च्या मर्यादेत रू.१,००,०००/- पर्यंत अनुदान देय आहे.

७.२) **शेततळी बांधणी, हरीतगृह, काढणी - पश्चात तंत्रज्ञान युनिट इ.** बाबी वरील अनुदान मर्यादेतून वगळण्यात आल्या आहेत.

## ८) कोरडवाहू क्षेत्र विकास या घटकाखालील समाविष्ट उपघटक :-

८.१) कोरडवाहू क्षेत्र विकास **(RAD)** घटकामध्ये एकात्मिक शेती पध्दती (**Integrated farming sytem)** व मूल्यवर्धन आणि शेती विकास (**Value Addition & Farm Development)** या दोन उपघटकांचा समावेश करण्यात आला आहे.

८.२) एकात्मिक शेती पध्दती या उपघटकातील प्रचलित पीक पध्दतीमध्ये साखळी पीक पध्दती(**Sequence Cropping System),** पिकांची फेरपालट, मिश्र पिके, आंतर पिके, पशुधन,मत्स्य विकास,वनिकरण,फळपिके यांचा समावेश करून स्थानिक परिस्थितीला अनुकूल अशी एकात्मिक शेती पध्दती विकसित करावयाची आहे.

८.३) **मूल्यवर्धन व शेती विकास** (**Value Addition & Farm Development)** या उपघटकाद्वारे कोरडवाहू शेतीमध्ये स्थैर्य निर्माण करणे अपेक्षित आहे.

## ९) कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) घटकांतर्गत समाविष्ट बाबींची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात यावी. :-

### ९.१) एकात्मिक शेती पध्दती (Integrated Farming Sytem):-

कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) हा घटक एकात्मिक शेती पध्दती (**IFS)** वर आधारित आहे. एकात्मिक शेती पध्दतीच्या आधारे नैसर्गिक आपत्ती काळात आणि अनपेक्षित हवामान

बदलांमुळे शेतीमधील नुकसानीची तीव्रता कमी करण्यासाठी पर्यायी साधन उपलब्ध करणे हा या घटकाचा उद्देश आहे. या घटकामध्ये खालीलबाबी अंतर्भूत आहेत.

**अ) पीक आधारित शेती पध्दती,**

**ब) फळपीक आधारित शेती पध्दती,**

**क) पशुधन आधारित शेती पध्दती,**

**ड) वनिकी आधारित शेती पध्दती**

उपरोक्त शेतीपध्दती किंवा इतर स्थानिक परिस्थितीस अनुकुल अशा नवीन विकसित झालेल्या शेती पध्दतींचा समावेश करुन प्रकल्पासाठी एकात्मिक शेती पध्दती प्रस्तावित करावयाच्या आहेत. बाबनिहाय राबवावयाच्या कार्यक्रमाबाबत मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

**अ) पीक पध्दती आधारित शेती पध्दती(Cropping System based farming System) :-**

अ.१) या बाबी अंतर्गत पाच पीक पध्दतींचा समावेश करण्यात आला आहे. त्याचा तपशील सोबतच्या **परिशिष्ट-१** मध्ये दिलेला आहे.

अ.२) पीक पध्दती या बाबीसाठी निविष्ठा खर्चाच्या ५०% जास्तीत जास्त रू.१०,०००/- प्रति हेक्टर अनुदान देय आहे. प्रति लाभार्थी २ हेक्टर मर्यादेपर्यंत लाभ देता येईल.

अ.३) सदर बाबीसाठी देय अनुदान जर लाभधारक प्रचलित पीक पध्दतीमध्ये बदल करून, इतर शेती पध्दतीतील एखादी बाब समाविष्ट करून वैविध्यपूर्ण शेती पध्दती विकसित करण्यास तयार असल्यास देय असेल.

**अ.४) अनुदान मर्यादा फक्त एका पिकाकरीता, एका हंगामाकरीता नसून पूर्ण वर्षाच्या पिक पध्दतीस आहे. ही बाब जाणीवपूर्वक निदर्शनास आणून देण्यात येत आहे.** तथापि, स्थानिक परिस्थितीनुरूप **परिशिष्ट-१** मध्ये निर्देशित केलेल्या पीक पध्दती व्यतिरिक्त अन्य पीक पध्दतींचा समावेश संशोधन संस्थांशी सल्लामसलत करून करता येईल.

**ब) फलोत्पादन आधारित शेती पध्दती (Horticulture Based Farming Sytem) :-**

महाराष्ट्र राज्य हे फळपिक उत्पादनात अग्रेसर राज्य आहे. राज्यात विविध प्रकारच्या फळपिकांचे उत्पादन होते. त्यामुळे फलोत्पादन आधारित शेती पध्दती विकसित करण्यास वाव

आहे. या शेती पध्दतीमध्ये फळपिके, भाजीपाला व फुले तसेच अन्नधान्ये पिके यांचा समावेश करून स्थानिक परिस्थितीस अनुकूल शेती पध्दती विकसित करण्यात यावी. यामध्ये रू.२५,०००/- प्रति हेक्टर व प्रति लाभार्थी दोन हेक्टर या मर्यादेत शेती पध्दतीसाठी खर्चाच्या ५०% अनुदान देय आहे. **सदर शेती पध्दती मधील निर्देशात्मक बाबींचा तपशील परिशिष्ट-१ मध्ये दिलेला आहे.**

**क) वनिकी आधारित शेती पध्दती (Agro- Forestry / Silvi Pastural Based Farming Sytem):-**

या शेती पध्दतीमध्ये उपयोगी वृक्ष लागवड, चारा वृक्ष, गवत, लाकूड व्यतिरिक्त इतर वन उत्पादने यांचा समावेश करावयाचा असून यासाठी रू.१५,०००/- प्रति हेक्टर व २ हे. प्रति शेतकरी कुटुंब या मर्यादेत निविष्ठा खर्चाच्या ५०% अनुदान देय आहे. **सदर शेती पध्दती मधील निर्देशात्मक बाबींचा तपशील परिशिष्ट-१ मध्ये दिलेला आहे.**

**ड) पशुधन आधारित शेती पध्दती (Livestock based Farming Sytem):-**

ड.१) पशुधन हा शेती विकासाच्या दृष्टीने महत्वाचा घटक आहे. पूर्वीपासून शेतीसोबत पशुपालन केले जाते. उच्च कॅलरीमूल्य व प्रथिने असणा-या प्राणीजन्य अन्नपदार्थास बाजारपेठेत प्रचंड मागणी आहे. पशुपालन व्यवसायाचा एकात्मिक शेती पध्दतीमध्ये समावेश केल्यास शेतक-यांना पूरक व शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करता येईल.

ड.२) पशुधन आधारित शेती पध्दतीमध्ये दूध उत्पादनासाठी योग्य असे पशुधन व इतर पशुधन यांचा समावेश होतो.

ड.३) दुग्ध उत्पादक पशुधन आधारित मिश्र शेती पध्दतीमध्ये गाय / म्हैसपालन, पीकपध्दती व चारा पीके यांचा समावेश करण्यात आला आहे.

ड.४) दुग्ध उत्पादक पशुधन आधारित मिश्र शेती पध्दतीसाठी एक हेक्टर पीक पध्दती,चारा पीके आणि एक संकरित गाय किंवा म्हैस अशी मिश्र शेती पध्दती विकसित करता येईल. यासाठी लाभार्थ्यास पिकांच्या निविष्ठा, एका वर्षासाठी प्राण्यांचे खुराक व प्राण्यांची किंमत यांच्या एकत्रित किमतीच्या ५०% जास्तीत जास्त रू.४०,०००/- प्रति हेक्टर अनुदान देय आहे.

ड.५) प्रति लाभार्थी २ हेक्टर या क्षेत्र मर्यादेत लाभ देता येईल.

ड.६) इतर पशुधन (शेळया-मेंढ्यापालन/कुक्कुटपालन) आधारित शेती पध्दतीमध्ये १० शेळया-मेंढ्या व १ हेक्टर मिश्र पीक पध्दती किंवा किमान ५० पक्षी व १ हेक्टर मिश्र पीक पध्दती असे संयोजन करावे. यासाठी लाभार्थ्यास पिकांच्या निविष्ठा, एका वर्षासाठी प्राण्यांचे/पक्ष्यांचे खुराक व प्राण्यांची/पक्ष्यांची किंमत यांच्या एकत्रित किमतीच्या ५०% जास्तीत जास्त रू.२५,०००/- प्रति हेक्टर अनुदान देय आहे. यापध्दतीसाठी प्रति लाभार्थी २ हेक्टर या क्षेत्र मर्यादेत लाभ देता येईल.

**ड.७) पशुधन आधारित शेती पध्दतीमध्ये देय अनुदान केवळ पशुधन खरेदीसाठी नाही याची नोंद घ्यावी.**

**ड.८) पशुधन आधारित शेती पध्दतीमध्ये पशुधन खरेदीसाठी खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.**

### ड.८.१) संकरीत गाई / म्हैस खरेदी : -

१. या घटकांतर्गत लाभार्थीची निवड झाल्यावर लाभार्थीनी एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थी हिश्याची रक्कम अथवा बँकेचे कर्ज उभारणे आवश्यक राहील.

२. एका कुटुंबातील एकाच खातेदारास लाभ देण्यात यावा.

३. या बाबीअंतर्गत वाटप करावयाच्या दुधाळ जनावरांमध्ये एच एफ, जर्सी या सारख्या संकरित किंवा गीर सारख्या जास्त दूध देणा-या देशी गायी तसेच मुऱ्हा व जाफराबादी किंवा पंढरपुरी या सुधारीत जातींच्या म्हशींचा समावेश असावा.

४. पशुधन खरेदी करण्यापूर्वी लाभार्थीच्या पशुधनाचे व त्यांच्या सुविधांचे सर्वेक्षण करावे; गोठयाचे, पशुधनाचे छायाचित्र घ्यावे व टिपण तयार करुन अहवाल तयार करावा व रेकॉर्ड ठेवावे.

५. दुधाळ जनावराची खरेदी खालील समितीद्वारे, लाभार्थीच्या पसंतीने करावी.

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचा-याचे पदनांम | समितीतील पदनांम |
|---|---|---|
| १. | उपविभागीय कृषि अधिकारी | अध्यक्ष |
| २. | तालुका कृषि अधिकारी | सदस्य |
| ३. | तंत्र अधिकारी,उ.वि.कृ.अ.,कार्यालय | सदस्य सचिव |
| ४. | मंडल कृषि अधिकारी | सदस्य |
| ५. | संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती | सदस्य |
| ६. | कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय दवाखान्याचे प्रमुख | सदस्य |

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचा-याचे पदनांम | समितीतील पदनांम |
|---|---|---|
| ७. | विमा प्रतिनिधी | सदस्य |
| ८. | गट प्रमुख आणि लाभार्थी | सदस्य |
| ९. | बँक प्रतिनिधी | सदस्य |

६. दुभत्या संकरित गाई/म्हशींची खरेदी जिल्हयाबाहेरून अथवा राज्याबाहेरून करावी जिल्हयात खरेदी करु नये, त्यानुसार आवश्यक ते नियोजन करावे.

७. वाटप करण्यात येणाऱ्या दुधाळ जनावरांचा ३ वर्षांसाठी विमा उतरविण्यात यावा.

८. खरेदी करण्यात आलेल्या पशुधनास टॅग लावावे, टॅग हरविल्यास बँकेला किंवा कृषि खात्यास लाभार्थीने कळवावे.

९. या बाबीअंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थींची यादी संबंधित तालुका कृषि अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील उपविभागीय कृषि अधिकारी व संबंधित ग्राम पंचायत यांचेस्तरावर उपलब्ध करुन द्यावी. तालुका कृषि अधिकारी यांनी लाभार्थींची नोंद पशुधनाच्या तपशीलासह स्वतंत्र नोंदवहीत घ्यावी.

१०. वाटप केलेल्या एकूण दुधाळ जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी १०० टक्के मंडल कृषि अधिकारी, २५ टक्के तालुका कृषि अधिकारी, १५ टक्के उपविभागीय कृषि अधिकारी व ५ टक्के जिल्हा अधिक्षक कृषि अधिकरी यांनी करावी.

११. लाभार्थीनी दिलेल्या शासकीय अनुदानाचा गैरविनियोग केल्याचे निदर्शनास आल्यास अनुदानाची व्याजासह एक रकमी वसुली महसुली कार्यपध्दतीने लाभार्थीकडून करण्यात यावी.

१२. या बाबी अंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्याने विहित नमुन्यातील बंधपत्र करून देणे आवश्यक राहील. लाभार्थ्याकडून घ्यावयाच्या बंधपत्राचे प्रारूप सोबत **परिशिष्ट -२ अ** मध्ये देण्यात आले आहे.

१३. दुधाळ जनावरांच्या खरेदी नंतर जनावरे वाहतुकीचा संपूर्ण खर्च लाभार्थ्याने करावा.

## ड.८.२) शेळी /कुक्कुटपालनासाठी पक्षी खरेदी : -

१) लाभार्थीनी एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थी हिश्याची रक्कम अथवा बँकेचे कर्ज उभारणे आवश्यक राहील.

२) एका कुटुंबातील एकाच खातेदारास या योजनेचा लाभ देण्यात यावा. यापूर्वी लाभ दिलेल्या लाभार्थीस पुन्हा सदर योजनेचा लाभ देण्यात येवू नये.

३) शेळया / पक्षी खरेदी खालील समितीद्वारे, लाभार्थीच्या पसंतीने करावी.

**शेळी गट खरेदी समिती -**

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचा-याचे पदनांम | समितीतील पदनांम |
|---|---|---|
| १. | उपविभागीय कृषि अधिकारी | अध्यक्ष |
| २. | तालुका कृषि अधिकारी | सदस्य |
| ३. | तंत्र अधिकारी, उ.वि.कृ.अ. कार्यालय | सदस्य सचिव |
| ४. | मंडल कृषि अधिकारी | सदस्य |
| ५. | संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती | सदस्य |
| ६. | कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय दवाखान्याचे प्रमुख | सदस्य |
| ७. | विमा प्रतिनिधी | सदस्य |
| ८. | गट प्रमुख आणि लाभार्थी | सदस्य |
| ९. | बँक प्रतिनिधी | सदस्य |

४) उस्मानाबादी / संगमनेरी किंवा विभागातील सुधारीत जातीच्या पैदासक्षम शेळया खरेदी प्राधान्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे यांचेकडून करण्यात यावी. कुक्कुटपालनासाठी सुधारित जातींच्या पक्ष्यांची खरेदी शासन प्राधिकृत संस्थेमार्फत करावी.

५) शेळया/ पक्षी, महामंडळाकडे/शासन प्राधिकृत संस्थेकडे उपलब्ध नसल्यास अधिकृत मान्यताप्राप्त बाजारातून शेळया/ पक्षी यांची खरेदी करण्यात यावी.

६). वाटप केलेल्या शेळया / पक्ष्यांचा, लाभार्थी व संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या संयुक्त नांवे तीन वर्षासाठी विमा उतरविण्यात यावा.

७) वाटप केलेल्या शेळया / पक्षी मृत झाल्यास विम्याच्या पैशातून लाभार्थ्यांना दुस-या शेळया / पक्षी खरेदी करुन पुरविण्यात याव्यात.

८). लाभार्थ्याकडे शेळया / पक्षी  संगोपनासाठी पुरेशी जागा असावी.

९) शेळया / पक्षी  खरेदीनंतर वाहतुकीचा संपूर्ण खर्च लाभार्थ्याने करावा.

१०). लाभार्थ्याने शेळी / पक्षी  पालन विषयक प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.

११). या बाबी अंतर्गत लाभार्थ्यांनी विहीत नमुन्यातील बंधपत्र करून देणे आवश्यक राहील. बंधपत्राचा नमुना **परिशिष्ट - २ ब** मध्ये  देण्यात आलेला आहे.

१२). तालुका कृषि अधिकारी यांनी  लाभार्थीची नोंद शेळया / पक्षी  यांच्या तपशिलासह स्वतंत्र नोंदवहीत घ्यावी.

१३). लाभार्थीने शेळया / पक्षी  यासाठी वितरीत केलेल्या शासकीय अनुदानाचा विनियोग दिलेल्या प्रयोजनासाठीच करणे आवश्यक राहील अनुदानाचा गैर विनियोग केल्याचे निदर्शनास आल्यास दिलेल्या अनुदानाची व्याजासह एक रकमी वसुली महसुली कार्यपध्दतीने लाभार्थीकडून करण्यात यावी.

१४)  वाटप केलेल्या एकूण शेळया/ पक्षी  यांची पडताळणी  १०० टक्के मंडल कृषि अधिकारी, २५ टक्के तालुका कृषि अधिकारी, १५ टक्के उपविभागीय कृषि अधिकारी व  ५ टक्के जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करावी.

१५). कृषि  विभागाचे अधिकारी ज्या ज्या वेळी शेळया / पक्षी  पडताळणीसाठी भेट देतील त्या त्या वेळी अधिकाऱ्यांना शेळया / पक्षी  दाखविणे लाभार्थ्यांस बंधनकारक राहील.

१६). वाटप केलेल्या शेळया / पक्ष्यांना नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातून आवश्यक रोगप्रतिबंधक लसीकरण करून घेणे, त्यांना जंतनाशके पाजणे ही सर्वस्वी जबाबदारी लाभार्थीची राहील.

## ९.२) मूल्यवर्धन व शेती विकास :-

### ९.२.१ मधुमक्षिकापालन :-

मनुष्याच्या आरोग्यासाठी मध हा अत्यंत गुणकारी आहे.आयुर्वेदामध्ये मधाचा औषध म्हणून वापर केला जातो. सद्यस्थितीत बाजारामध्ये शुध्द मधाची खूप मागणी आहे. शेतक-यांनी फळ / फुले किंवा पीक आधारित शेती पध्दतीमध्ये मधुमक्षिका पालनाचा पूरक व्यवसाय सुरू केल्यास त्याला परागीकरणाच्या माध्यमातून पीक उत्पादन वाढीबरोबरच मधापासून आधिकचे उत्पन्न प्राप्त

होईल. मधुमक्षिका वसाहत व मधुमक्षिका संचवाटपाबाबत सूचना खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

१) राज्यात मधुमक्षिकापालन योजनेंतर्गत राज्य पदनिर्देशित प्राधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या किंवा मंडळ स्तरावरुन मान्यता दिलेल्या स्थानिक कारागिरांमार्फत मधुमक्षिका संच घेणे बंधनकारक राहील.

२) एका लाभार्थ्यास प्रत्यक्ष येणा-या खर्चाच्या ५०% कमाल रु.१०००/- प्रति मधुमक्षिका संच यामर्यादेत,जास्तीत जास्त रु.२०,०००/-प्रति लाभार्थी अनुदान देय आहे. एका मधुमक्षिका संचामध्ये ४ खणांची चौकटव राणी माशीसह मधमाशांच्या पोळ्याकरीता सदरचे अनुदान देय राहील.

३) वाहतूक,पॅकींग,मजूरी,आकस्मिक ई.साठी येणारा जास्तीचा खर्च लाभार्थ्यास करावा लागेल.

४) पेटीचे आकारमान व इतर तपशिल तसेच स्थानिक पूरवठादारांची यादी याबाबत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या(M I D H) मार्गदर्शक सूचना अनुसराव्यात.

५) मधुमक्षिका वसाहतींसाठी **एपिस मेलिफेरा व एपिस सिराना** या जातींच्याच मधमाशांचा वापर करण्यात यावा.

६) या योजनेमध्ये लाभ घेणा-या शेतक-यांचे प्रशिक्षण केंद्रीय मधुमक्षिका संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, खादी व ग्रामोद्योग आयोग, ११५३ गणेशखिंड रोड, पुणे १६ येथे आयोजित करावे व त्याकरीता येणारा खर्च,**एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या(M I H D )** मनुष्यबळ विकास घटकांतर्गत करण्यात यावा.

७) मधुमक्षिकापालन बाबीसाठी लाभार्थी निवडीचे निकष -

७.१ ज्या शेतक-यांनी मधुमक्षिकापालनाचे प्रशिक्षण घेतलेले आहे किंवा प्रशिक्षण घेण्यास तयार आहेत, अशा शेतक-यांना मधुमक्षिका संचाचे वाटप प्राधान्याने करावे.

७.२ लाभार्थी शेतक-याकडे मधुमक्षिकापालन क्षेत्रात शेवगा, सूर्यफूल, घाणेरी, मोहरी इ. फुलो-यात असणा-या वनस्पतींची लागवड असावी.नसल्यास बांधावर लागवड करण्यात यावी जेणेकरुन, मधमाशांना नियमित व पुरेसा अन्नपुरवठा उपलब्ध होऊ शकेल.

७.३ महिला शेतकरी, महिला बचत गट, अनुसूचित जाती/जमातींच्या शेतकरी गटाकरीता/सुशिक्षीत बेरोजगार युवकांचे गटांना प्राधान्याने लाभ देण्यात यावा. लाभार्थींची निवड संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करावी.

७.४ या घटकांतर्गत एका लाभार्थ्यास कमाल २० मधुमक्षिका संचाच्या मर्यादेत लाभ देय आहे.

७.५ या घटकांतर्गत एका लाभार्थ्यास किंवा गटाला फक्त एकदाच लाभ देण्यात यावा ल यापूर्वी या बाबीसाठी इतर योजनांतून लाभ घेतलेला नसावा.

७.६ या योजनेअंतर्गत शासनाने ठरवून दिलेली खर्च प्रमाणके ही लाभार्थी शेतक-यांस मंजूर असतील व निश्चित केलेल्या खर्चापेक्षा अधिक खर्चाची जबाबदारी लाभ धारक शेतक-याला स्वखर्चातून करावी लागेल.

७.७ ज्या क्षेत्रात मधुमक्षिकापालन करावयाचे आहे त्या परिसरात रासायनिक कीटकनाशकांचा वापर अत्यंत माफक असावा व मधुमक्षिका पालनास हानीकारक ठरणार नाही अशाच कीटकनाशकांचा वापर करणे गरजेचे आहे.

७.८ लाभार्थी शेतक-यांना लागणा-या मधुमक्षिकापालनाची निविष्ठा/संच शासनाने विहित केलेल्या स्त्रोताकडून घेणे बंधनकारक राहील.

### ९.२.२ मूरघास युनिट :-

जनावरांसाठी वर्षभर हिरवा चारा उपलब्ध व्हावा जेणेकरून दुग्धोत्पादनात वाढ व्हावी यासाठी अतिरिक्त हिरव्या चा-याची साठवण करून टंचाई काळात पशुधनाच्या हिरव्या चा-याची गरज भागविणे यासाठी या घटकातून मूरघास युनिट उभारण्यासाठी अनुदान देय आहे.

यामध्ये वीट सिमेंट यांचे बांधकाम असलेला २१०० ते २५०० घन मीटर चा सायलोपीट चाफकटर व वजनकाटा यांचा समावेश आहे. यासाठी खर्चाच्या १००% परंतु रू.१,२५,०००/- प्रति लाभार्थी या कमाल मर्यादेत अनुदान देय आहे. यासाठी सूचना खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

अ) निवडलेल्या प्रकल्प गांवातील वैयक्तिक शेतकरी, सहकारी दुग्ध उत्पादक संस्थाचे सभासद, शेतकरी गट, इ. लाभार्थी लाभ घेऊ शकतील.

ब) लाभार्थ्याकडे लहान- मोठी कमीतकमी १० जनावरे असावीत. तथापि अनुसुचित जाती /जमाती तसेच महिला शेतकरी लाभार्थ्याकडे कमीतकमी ५ जनावरे असावीत. संकरीत व सुधारीत प्रजातीची, जनावरे असणाऱ्या शेतकरी / पशुपालकास प्राधान्य देण्यात यावे.

क) लाभार्थी शेतक-यांने यापूर्वी या योजनेचा इतर कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय संस्थांकडून लाभ घेतलेला नसावा.

ड) मुरघासाकरिता आवश्यक असणा-या अतिरिक्त वैरण उत्पादनाकरिता वैरण पिकाखालील क्षेत्र असावे.

ई) मूरघास युनिट उभारणी साठीच्या तांत्रिक बाबीकरीता आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य पुणे-१ या कार्यालयाने, केंद्र पुरस्कृत वैरण विकास व पशुखाद्य विकास योजने अंतर्गत मूरघास तयार करण्याचे युनिट ( Silage Making Unit ) स्थापन करणेसंदर्भातील जा.क्र.वैविअ-१६(५८)/२४३६-२५१०/२०१२, पसं-१४,पुणे-०१, दि. १२ / १० /२०१२ अन्वये निर्गमित केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचना अनुसराव्या.

**९.२.३ हरीत गृह उभारणी -**

कृषि उत्पादन आणि उत्पादकता वाढीसाठी प्लॅस्टीक वापराचे तंत्रज्ञान महत्वाचे असून त्याचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. प्लॅस्टीक तंत्रज्ञानामुळे उत्पादन आणि उत्पादकतेत भरीव वाढ होते. तसेच हरितगृहाचा उपयोग प्रामुख्याने बिगरहंगामी पिके घेण्यासाठी, उच्च प्रतीच्या फुलांच्या उत्पादनासाठी व उतीसंवर्धनाद्वारे तयार केलेल्या रोपांची वाढ करणे व रोपवाटीका तयार करण्यासाठी करण्यात येतो. कोरडवाहू क्षेत्र विकास या घटकांतर्गत खालील तीन प्रकारच्या हरितगगृहांचा समावेश करण्यात आला आहे.

**(अ) ट्युब्युलर पॉली हाऊस :-** टयुब्युलर (Tubular) आकाराचे १००० चौ.मी.चे हरीतगृह उभारणीसाठी लाभधारक शेतक-यांना एकूण खर्चाच्या ५०% व रू.५००/- प्रति चौ.मी. या मर्यादेत अनुदान देय आहे.

**(ब) लाकडी सांगाडा व नैसर्गिक वायुविजन आधारित हरितगृह :-** या हरितगृहाच्या प्रत्येक युनिटसाठी १००० चौ.मी. ही क्षेत्र मर्यादा ठरविण्यात आली आहे. रू.२७०/- प्रति चौ.मी. या मर्यादेत खर्चाच्या ५०% अनुदान देय आहे.

**(क) लो टनेल पॉली हाऊस :-** या हरितगृहाच्या प्रत्येक युनिटसाठी १००० चौ.मी. ही क्षेत्र मर्यादा ठरविण्यात आली आहे. रू.१५/- प्रति चौ.मी. या मर्यादेत खर्चाच्या ५०% अनुदान देय आहे.

१. शेतक-याकडे हरितगृहासाठी पाणीपुरवठ्याची सुविधा व विद्युत पुरवठा असणे आवश्यक आहे.

२. हरितगृहामध्ये लागवड करताना फलोत्पादन (फुले,फळे,भाजीपाला,औषधी व सुंगधी वनस्पती, मसाला पिके,इत्यादी) पिकांचा समावेश असावा.

३. एका लाभार्थ्यास फक्त एकदाच लाभ घेता येईल. या बाबीकरीता इतर शासकीय अनूदान घेतलेले नसावे.

४. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, लहान शेतकरी इत्यादींना प्राधान्याने शासकीय धोरणानुसार लाभ देण्यात यावा.

५. लाभ घ्यावयाच्या सर्व लाभार्थ्यांनी हरितगृह तंत्रज्ञानाबद्दल प्रशिक्षण घेतलेले असावे / घेणे आवश्यक राहील.

६. लाभार्थ्याने हरितगृह बांधकाम करणा-या ठेकेदाराकडून प्रथम आराखडा व खर्चाचे अंदाजपत्रक करुन घ्यावे व ते प्रस्तावासोबत जोडावे.

७. हरितगृह उभारणीसाठी वैयक्तिक शेतकरी, महिला बचत गट, शेतकरी समुह, यांना लाभ घेता येईल.

८. हरितगृहासाठी जागेची निवड, अर्जाचा नमुना, पूर्वसंमतीपत्र, करारनामा व हरितगृह उभारणी साठीच्या तांत्रिक बाबीकरीता **एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या (M I D H)** मार्गदर्शक सूचना अनुसराव्यात.

**९.२.४ जलसंचय व व्यवस्थापन :-**

**९.२.४.१ वैयक्तिक शेततळे :-**

१. पाण्याचे स्त्रोत निर्माण करणे व साठवलेले पाणी झिरपून वाया जावू नये आणि पाणी टंचाईच्या काळात साठवलेल्या पाण्याचा उपयोग व्हावा यासाठी निवडलेल्या गांवात शेततळे खोदकाम व अस्तरीकरण करण्यासाठी अनुदान देण्यात येईल.

२. या घटकांतर्गत वैयक्तिक शेततळ्यांचा लाभ शेतक-यांना देता येऊ शकतो. शेततळे बांधणीचा(खोदकाम व अस्तरीकरण) दर रू.१२५/- प्रति घ.मी. मैदानी प्रदेशासाठी व रू.१५०/- प्रति घ.मी. डोंगराळी प्रदेशासाठी निश्चित करण्यात आला आहे.

३ शेततळ्याच्या आकारमानाच्या प्रमाणात वैयक्तिक शेततळ्यासाठी ५०% अनुदान देय राहील. तथापि, जास्तीत जास्त अनुदान रू.७५,०००/- प्रति लाभार्थी ( मैदानी प्रदेश) व रू.९०,०००/- प्रति लाभार्थी (डोंगराळी प्रदेश) देता येईल.

**९.२.४.२ शेततळयांचे अस्तरीकरण :-**

शेततळ्यातील पाणी जमिनीमध्ये जिरुन वाया जाऊ नये म्हणून निवडलेल्या गांवात या पूर्वी विविध योजनेमधून खोदलेल्या वैयक्तिक शेततळयांच्या अस्तरीकरणासाठी अनुदान देय राहील. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना(MGNREGS) व राष्ट्रीय कृषि विकास योजना(RKVY) या योजनांतर्गत खोदकाम करण्यात आलेल्या वैयक्तिक शेततळयांच्या प्लॅस्टिक फिल्म अस्तरीकरणासाठी एकूण खर्चाच्या ५० टक्के जास्तीत जास्त रू.२५,०००/- प्रति शेततळे अनुदान देय आहे.

**९.२.४.३ सामुहिक जलसाठा साधने :-** सामुदायिक क्षेत्रावर सामुहिक शेततळे / चेक डॅम बांधण्याची तरतूद या घटकांतर्गत करण्यात आली आहे. किमान १० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याची क्षमता असलेल्या शेततळे / चेक डॅम साठी १००% अनुदान तत्वावर रू.२०,००,०००/- प्रति शेततळे / चेक डॅम मैदानी प्रदेशासाठी व रू. २५,००,०००/- प्रति शेततळे / चेक डॅम डोंगराळ प्रदेशासाठी अनुदान देय आहे. यामध्ये खोदकाम व अस्तरीकरण यांचा समावेश आहे. कमी लाभक्षेत्राचे शेततळे/ चेक डॅम साठी प्रो-राटा बेसिस (Pro-rata basis) वर अनुदान देय आहे. या बाबीच्या अंमलबजावणीसाठी **एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या (M I D H)** मार्गदर्शक सूचना अनुसराव्यात.

**९.२.४.४ लहान जलसाठ्यांची दुरूस्ती :-** शेतक-यांकडे दुरूस्ती अभावी वापरात नसलेल्या जलसाठा साधनांच्या दुरूस्तीसाठी या योजनेतून लाभ देता येतो. यामध्ये दुरूस्ती खर्चाच्या ५०% व रू.१५०००/- कमाल मर्यादेत अनुदान देय आहे.

**९.४.४.५ पाईप पुरवठा :**

पाण्याच्या स्त्रोतापासून प्रक्षेत्रावर पाणी नेण्यासाठी व पिकांना पाणी देण्यासाठी एचडीपीई पाईप व पीव्हीसी पाईप पुरवठा ही बाब समाविष्ट करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने एचडीपीई / पीव्हीसी पाईप पुरवठा संदर्भात पूरक सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

५.१) शेतक-यास प्रत्यक्ष आवश्यकतेनुसार सर्व प्रकारच्या व्यासाचे पाईप पुरवठा करावयाचा असून यासाठी लाभार्थी शेतक-यांना किंमतीच्या ५०% किंवा रु.१०,०००/- प्रति हेक्टर यापैकी कमी असलेली रक्कम अनुदान म्हणून देय राहील.

५.२) प्रति लाभार्थी ४ हेक्टर इतकी क्षेत्रमर्यादा आहे.

५.३) शेतक-यांच्या मागणीनुसार ६३ एमएम, ७५ एमएम, ९० एमएम व्यासाच्या पाईपचा पुरवठा करण्यात यावा.

५.४) पुरवठादार संस्थानी पाईप पुरवठा करताना, पुरवठा करण्यात येणा-या प्रत्येक पाईपवर योजनेचे नाव व वर्ष टाकणे (Embosing) आवश्यक आहे.

५.५) पुरवठा आदेश देताना लाभार्थ्यांनी मागणी केलेल्या परंतु शासन निर्णयामध्ये समाविष्ट असलेल्या कंपनीचा व ब्रँड नेमच्या ६३ एमएम, ७५ एमएम, ९० एमएम व्यासाच्या ६ मीटर पाईपचे आदेश देण्यात यावेत.

५.६) एचडीपीई पाईप हे निर्धारीत केलेल्या गुणवत्तेचे आहेत कि नाही याची तपासणी करुन घेण्यात यावी. तपासणी झाल्यानंतर सदर पाईप योग्य गुणवत्तेचे आढळून आल्यास संबंधीत देयकाची अदायगी १५ दिवसाच्या आत पुरवठा संस्थेस करण्यात यावी. तसेच लाभार्थी हिस्सा प्राप्त झाल्यानंतर सदर रक्कम पुरवठा संस्थेस तात्काळ अदा करण्यात यावी.

**५.७) कोरडवाहू शेती अभियान अंतर्गत शासनाने खुल्या बाजारातूनही शेतक-यांना त्यांच्या पसंतीचे पीव्हीसी पाईप खरेदी करण्यास मान्यता दिलेली आहे. त्याच धर्तीवर शेतक-यांनी खुल्या बाजारातून खरेदी केलेल्या पीव्हीसी पाईप साठी अनुदान मंजूरीकरीता खालील प्रमाणे कार्यपध्दती अनुसरावी.**

I) शेतक-यांनी त्यांच्या पसंती व आवश्यकतेनुसार ६३ एमएम, ७५ एमएम, ९० एमएम व्यासाच्या पीव्हीसी पाईपची खरेदी ISI प्रमाणित पीव्हीसी पाईपचा पुरवठा करणा-या कंपनीकडून अथवा

त्यांच्या अधिकृत विक्रेत्याकडून करावी व अनुदानासाठीचा **परिशिष्ट-३** मधील अर्ज खरेदी पावतीसह तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा. तालुका कृषि अधिकारी यांनी प्राप्त अर्जाची नोंद नोंदवहीत करावी.

II) मंडल कृषि अधिकारी यांनी कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यकांच्या मदतीने लाभधारकाने प्रत्यक्षात पीव्हीसी पाईपची खरेदी केली असल्याबाबत खात्री करुन **परिशिष्ट-४** मधील प्रमाणपत्र तालुका कृषि अधिकारी यांना सादर करावे. तालुका कृषि अधिकारी यांनी प्राप्त तपासणी प्रमाणपत्रानुसार आपल्या शिफारशीसह अनुदानाचा प्रस्ताव मंजूरीसाठी उपविभागीय कृषि अधिकारी यांचकडे सादर करावा.

III) उपविभागीय कृषि अधिकारी यांनी प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन प्रस्तावांना मंजूरी देवून यादी तालुका कृषि अधिकारी यांना पाठवावी.

IV) तालुका कृषि अधिकारी यांनी मंजूर यादी नुसार ८ दिवसांत अनुदानाची रक्कम विहीत लेखा कार्यपध्दती नुसार संबंधित लाभधारकांच्या बँक खात्यावर जमा करावी.

V) शासनाने खुल्या बाजारातून शेतक-यांना त्यांच्या पसंतीचे पीव्हीसी पाईप खरेदी करण्यास मान्यता दिलेली असली तरी, अनुदानाच्या रकमेची परिगणना करताना शासनाने महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडून पुरवठा करण्यासाठी पीव्हीसी पाईपसाठी जे दर निश्चित केलेले आहेत त्या दराने अनुदानाची परिगणना करुन कमीत कमी येणारी अनुदानाची रक्कम अनुज्ञेय करावी.

**९.२.४.६ डिझेल/विद्युत पंप पुरवठा :**

६.१ कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर पुरवठा करावयाच्या कृषि औजारे, पीक संरक्षण औजारे, विद्युत/डिझेल/पेट्रोल पंपसंच एचडीपीई पाईप यांचे सन २०१३-१४ करिताचे दर कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-२०१३/प्र.क्र१५८/११-३-अे, दिनांक २७/०९/२०१३ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार व कार्यपध्दतीनुसार या पंपसंचाची खरेदी करण्यात यावी. यामध्ये शासनाने दर सुधारणा केल्यास ते दर या कार्यक्रमासाठी लागू रहातील.

६.२ तांत्रिक तपासणीमध्ये औजारांचा जो लॉट अपात्र ठरेल तो मूळ संस्थेस त्यांच्या वाहतुक खर्चाने परत करावा तसे बंधन त्यांना पुरवठा आदेश देताना नमुद करावे.

६.३ **विद्युत पंप अथवा डिझेल इंजिन** पुरवठयासाठी एकूण खर्चाच्या ५० टक्के मात्र जास्तीत जास्त रु.१५,०००/- अनुदान देय राहील.

**९.२.४.७ सोलार / विंड पंप पुरवठा :** सोलार / विंड पंप पुरवठयासाठी एकूण खर्चाच्या ५० टक्के मात्र जास्तीत जास्त रु.५०,०००/- अनुदान देय आहे. सोलार / विंड पंपाची मागणी लाभधारकाकडून प्राप्त झाल्यास, महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरणाशी (MEDA) संपर्क करुन सोलार / विंड पंप पुरवठयाबाबतच्या महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरणाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून सोलार अथवा विंड पंप पुरवठा करण्यात यावा.

**९.२.५ गांडुळ खत व सेंद्रिय निविष्ठा उत्पादन :-** कृषि उत्पादनात शाश्वतता आणण्यासाठी जमिनीचा कस टिकविणे अत्यंत महत्वाचे असते. यासाठी सेंद्रिय निविष्ठांचा वापर करणे आवश्यक आहे. तसेच या प्रकारच्या निविष्ठांचे उत्पादन शेतक-यांना करता येणे शक्य आहे. गांडुळ खताची निर्मिती, सेंद्रिय निविष्ठा उत्पादन व हिरवळीचे खत यासाठी या घटकातून अनुदान देय आहे.

**अ) कायमस्वरूपी गांडूळ खत निर्मिती युनिट** :- ३० फूट लांब, ८ फूट रुंद व २.५ फूट उंच (शेडसहित) कायमस्वरूपी गांडूळ खत निर्मिती युनिट उभारण्यासाठी अपेक्षित खर्चाच्या ५० टक्के जास्तीत जास्त रु. ५०,०००/- इतके अनुदान देय राहील. तांत्रिक बाबीसाठी **एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या (M I D H)** मार्गदर्शक सूचना अनुसराव्यात.

**ब) एच.डी.पी.ई. बेड गांडूळ खत निर्मिती युनिट** :- एचडीपीई पासून तयार केलेल्य १२ फूट लांब, ४ फूट रुंद व २ फूट उंच (एकूण ९६ घनफूट) या आकारमानाच्या छोट्या युनिटसाठी खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीतजास्त रु.८०००/- प्रती युनिट अनुदान देय राहील. एचडीपीई मटेरिअलचा दर्जा हा बीआयएस प्रमाणित असणे बंधनकारक असून तो IS १५९०७:२०१० या दर्जाचा असावा.

**क) हिरवळीची खत निर्मिती :-** ताग, धेंचा, चवळी इ. हिरवळीच्या खताच्या पिकांची लागवड करुन पीक फुलो-यात येताच जमिनीत गाडल्यास जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते.

जमिनीची पाणी धारण क्षमता वाढविणे, सुपिकता सुधारणे, तसेच क्षारयुक्त जमिनीची सुधारणा करण्यासाठी हिरवळीच्या खताचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यात येते. या खतांच्या वापरामुळे उत्पादनात वाढ होते. हिरवळीचे खत निर्मितीसाठी एकूण खर्चाच्या ५०% व रू.२,०००/-प्रति हेक्टर व प्रति लाभार्थी २ हेक्टर या कमाल मर्यादेत अनुदान देय आहे.

**९.२.६ काढणी पश्चात साठवणूक / प्रक्रिया :-** गावस्तरावर उत्पादित झालेल्या शेतीमालाचे बाजारमूल्य वाढविण्यासाठी उत्पादनाची योग्य साठवणूक, शेतीमालाची प्रक्रिया व पॅकेजिंग या काढणी पश्चात तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) या घटकातून गावस्तरावर, प्रक्रिया युनिट / पॅकेजिंग युनिट / पॅक हाऊस बांधण्यासाठी अनुदान देय आहे. यासाठी एकूण खर्चाच्या ५०% रू.४,०००/- प्रति चौ.मी व रू.२,००,०००/-प्रति युनिट या कमाल मर्यादेत अनुदान देय आहे. सदर बाबीच्या अंमलबजावणीसाठी **एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या (M I D H)** पॅकहाऊस बांधणीच्या मार्गदर्शक सूचना अनुसराव्यात.

**९.२.७ भू-सुधारणा :-** महाराष्ट्रातील काही भागात चोपण / क्षारपड व आम्ल धर्मीय जमीन आढळतात. अशा प्रकारच्या जमीनीमध्ये उत्पन्न वाढविण्यासाठी भू-सुधारणा करणे आवश्यक आहे. प्रकल्पामध्ये अशा प्रकारच्या जमीनी असल्यास भू-सुधारणेसाठी अनुदान देय आहे. आम्ल धर्मीय जमीन सुधारणेसाठी रू.३,०००/- प्रति हेक्टर या कमाल मर्यादेत एकूण खर्चाच्या ५०% अनुदान देय आहे. तसेच क्षारपड / चोपण जमीन सुधारणेसाठी एकूण खर्चाच्या ५०% व जास्तीत जास्त रू.२५,०००/- प्रति हेक्टर कमाल मर्यादेत अनुदान देय आहे. प्रत्येक लाभार्थ्यास दोन हेक्टर या कमाल क्षेत्र मर्यादेत अनुदान देय आहे.

**९.२.८ प्रशिक्षण :-**

**अ) शेतक-यांचे प्रशिक्षण :-**

१.१ निवडलेल्या प्रकल्पातील २० किंवा त्यापेक्षा जास्त शेतक-यांसाठी प्रत्येक हंगामात १ या प्रमाणे खरीप व रब्बी हंगामामध्ये कृषि विद्यापीठे आणि कृषि विज्ञान केंद्राच्या सहाय्याने प्रशिक्षण आयोजीत करुन त्यांना प्रशिक्षित करण्यात येईल.

१.२ प्रति शेतकरी प्रतिदिन रु.२५० या प्रमाणे २ दिवसासाठी जास्तीत जास्त रु.१००००/- खर्च प्रमाणक राहील.

१.३ सन २०१४-१५ मध्ये खरीप व रबी हंगामात आयोजीत करावयाच्या **शेतकरी** प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमामध्ये **राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान,** त्यामध्ये अंतर्भूत घटक, एकात्मिक शेती पध्दती संकल्पना (**Integrated Farming System Concept**) हवामान बदल स्वीकृती तंत्राज्ञान (**Climate Change Adaptation Technology**) आणि मृदा व जलव्यवस्थापन (**Soil & Water Conservation)** या विषयांचा समावेश करण्यात यावा. आवश्यक त्या प्रात्यक्षिकांसह योग्य प्रकारे प्रशिक्षण कार्यक्रम राबवू शकणा-या कृषि विज्ञान केंद्र, कृषि विद्यापीठे, कृषि महाविद्यालये, विभागीय कृषि संशोधन केंद्र यापैकी जिल्ह्यात एक किंवा दोन संस्थांची प्रशिक्षणासाठी निवड करावी आणि सदर संस्थांच्या सहमतीने प्रशिक्षणाचा तारीखवार कार्यक्रम निश्चित करावा.

**ब) शेतकरी क्षेत्रीय भेट :-**

१.१ निवडलेल्या प्रकल्पातील ५० शेतक-यांकरीता २ दिवसासाठी जिल्हांतर्गत क्षेत्रिय भेटीचे आयोजन करण्यात यावे.

१.२ क्षेत्रिय भेटीकरीता ५० शेतक-यांसाठी २ दिवसाकरीता कमाल खर्च मर्यादा रु.२००००/- राहील.

१.३ विहीत खर्च प्रमाणकापेक्षा जास्त खर्च येत असल्यास तो सहभागी शेतक-याकडूनघ्यावा. त्याबाबतच्या स्पष्ट सूचना लाभार्थी निवडीच्या वेळेस लाभार्थीना द्याव्यात.

१.४ क्षेत्रिय भेट आयोजित करतांना जिल्हयातील कृषि विद्यापीठे, कृषि संशोधन केंद्र, राष्ट्रीय कृषि संशोधन केंद्र (NRC), कृषि क्षेत्रात विशेष काम करणा-या खाजगी कंपन्या / संस्था, प्रगतीशील शेतक-यांची प्रक्षेत्रे, कृषि विभागाची विविध प्रक्षेत्रे, इत्यादींना भेटी आयोजित कराव्यात.

## १०. इतर योजना/प्रकल्पांबरोबर कार्यक्रमाची सांगड (योजनांचे एकत्रीकरण) (Convergence of Schemes) :-

कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) या घटकाचे मुख्य उद्दिष्ट उपजिविकेच्या पर्यायी संधी निर्माण करणे व आपत्ती काळात शाश्वत उत्पन्नाची हमी देणे हे आहे. फक्त पीक आधारित शेती पध्दती या घटकाचे उद्दिष्ट पूर्ण करू शकत नाही. यासाठी कृषि आधारित उत्पन्नाचे स्त्रोत जसे की, पशुधन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, फळपिके, वनिकी या बाबींचा शेती पध्दतीत समावेश होणे आवश्यक आहे. पीक पध्दतीसाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, तेलबिया व तेलताड

अभियान, इ. योजना राबविण्यात येत आहेत. कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) या घटकातील पर्यायी उपजिविका साधनांसाठी जास्तीचा निधी उपलब्ध होण्यासाठी पीक पध्दतीसाठी वरीलप्रमाणे योजनांचा निधी उपलब्ध करून घ्यावा. ज्या जिल्ह्यांमध्ये या योजना राबविण्यात येत नाहीत अशा जिल्ह्यांमध्ये या घटकातून निधी उपलब्ध करून देता येईल. परंतु लाभार्थ्यांने प्रचलित पीक पध्दतीमध्ये बदल करून त्यास वैविध्यपूर्ण बनविणे आवश्यक आहे.

## ११. सविस्तर प्रकल्प आराखडा :-

११.१) प्रत्येक प्रकल्प किमान ३०० हेक्टरचा असावा. प्रत्येक प्रकल्पासाठी रू.५५ लाख निधी प्रस्तावित करण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रकल्प आराखडे तयार करावेत.

११.२) कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) अंतर्गत प्रस्तावित करावयाच्या बाबी पुढील प्रमाणात प्रस्तावित कराव्यात. यामध्ये क्षेत्रीय स्तरावरील गरजेनुरूप अल्प प्रमाणात बदल करता येईल. तथापि, कोणत्याही एकाच बाबीवर मोठया प्रमाणात खर्च प्रस्तावित करू नये.

| अ. क्र. | उपघटक / बाबी | ढोबळ मानाने प्रमाण |
|---|---|---|
| | **१. एकात्मिक शेती पध्दती** | |
| १.१ | पीक आधारीत शेती पध्दती | ५ टक्के |
| १.२ | फळपिक आधारीत शेती पध्दती | १२ टक्के |
| १.३ | पशुधन आधारित शेती पध्दती | २५ टक्के |
| १.४ | वनिकी अधारीत शेती पध्दती | ३ टक्के |
| | **२. शेती विकास व मूल्यवर्धन** | |
| १ | मधु मक्षिका पालन | १ टक्का |
| २ | मूरघास युनिट | ५ टक्के |
| ३ | हरितगृह | १३ टक्के |
| ४ | जल संचय व जलव्यवस्थापन | २५ टक्के |
| ५ | गांडूळ खत व सेंद्रिय निविष्ठा उत्पादन | ५ टक्के |
| ६ | काढणी पश्चात व साठवण प्रक्रिया युनिट | ५ टक्के |
| ७ | भू-सुधारणा | आवश्यकतेनुसार |
| ८ | प्रशिक्षण व क्षेत्रीय भेट | १ टक्का |
| | एकूण | १०० टक्के |

११.३) कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) साठी निवडण्यात आलेल्या सर्व प्रस्तावित प्रकल्पांतर्गत गावांचे सविस्तर प्रकल्प आराखडे मंडल कृषि अधिकारी आणि तालुका कृषि अधिकारी यांच्या सहाय्याने संबंधित उपविभागीय कृषि अधिका-यांनी तयार करावेत.

११.४) सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक प्रपत्र **परिशिष्ट-५** मध्ये सहपत्रित केलेली आहेत. त्यानुसार प्रत्येक प्रकल्पाचा आराखडा तयार करावा. तसेच याबाबतचा गोषवारा केंद्र शासनाच्या इंग्रजी भाषेतील मार्गदर्शक सूचनांमधील **Appendix–II A** मध्ये तयार करून कृषि आयुक्तालयास सादर करावा.

११.५) सविस्तर प्रकल्प आराखडा प्रपत्रातील माहिती भरताना ती अचूक व स्वयंस्पष्ट असेल याची खात्री करावी.

११.६) निवडलेल्या प्रकल्पांतर्गत गांवामध्ये बैठकीचे आयोजन करुन कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) व त्यातील समाविष्ठ घटकाबाबत सविस्तर माहिती तालुका कृषि अधिकारी यांनी ग्रामस्थांना द्यावी.

११.७) सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करताना शेतकरी लाभार्थी हा केंद्र बिंदू ठरविण्यात यावा. वैयक्तिक लाभार्थी कार्यक्रम प्रस्तावित करण्यापूर्वी, संबंधित लाभार्थी कुटुंबाशी चर्चा करावी व त्यांचेकडून विहित प्रपत्रातील अर्ज भरून घ्यावा. लाभार्थी अर्जाचा नमुना **परिशिष्ट-६** मध्ये दिलेला आहे.

११.८) गावाचा प्रकल्प आराखडा तयार करताना, पायाभूत सर्वेक्षणाच्या आधारावर गावाची सविस्तर माहिती आराखडयात भरावी.

११.९) प्रकल्प आराखडयात कोरडवाहू क्षेत्र विकास या घटकातून प्रकल्पामध्ये प्रस्तावित करावयाच्या बाबी तसेच इतर योजनांचे एकत्रिकरण **(Convergence of Schemes)** यातून प्रस्तावित करावयाच्या बाबी स्वतंत्रपणे नमूद कराव्यात.

११.१०) उपविभागीय कृषि अधिकारी यांनी, तयार केलेले गावांचे सविस्तर प्रकल्प आराखडे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावेत.

११.११) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी प्रत्येक गावाच्या सविस्तर प्रकल्प आराखडयाची छाननी करुन आराखडे योग्य असल्याबाबत खात्री करुनच, जिल्हास्तरीय अभियान समिती **(DMC)** च्या मान्यतेसाठी सादर करतील.

११.१२) जिल्हास्तरीय अभियान समितीने **(DMC)** मान्यता दिलेले आराखडे विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयास व कृषि आयुक्तालयास सादर करावेत. विभाग स्तरावर प्राप्त आराखड्याचे संकलन करून मूळ प्रकल्प आराखड्यांच्या प्रतींसहित **APPENDIX-II A** कृषि आयुक्तालयास सादर करावेत.

## १२. कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) अंमलबजावणी करीता अधिका-यांच्या कर्तव्ये व जबाबदा-या :

**१२.१** या कार्यक्रमाचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी राज्यस्तरावर कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), विभागस्तरावर विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हा स्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उपविभागस्तरावर उपविभागीय कृषि अधिकारी आणि तालुका स्तरावर तालुका कृषि अधिकारी यांची राहील.

**१२.२ तालुका कृषि अधिकारी व निवड केलेल्या गावाशी संबंधित प्रकल्प कार्यान्वयन पथक (Project Implementing Team)(मंडल कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक) यांचेवर प्रकल्पाच्या अंमलबजावणीची खालील प्रमाणे जबाबदारी राहील :-**

- गावाचे पायाभूत सर्वेक्षण (**Baseline-Survey**) करीत असताना ग्राम सभेस उपस्थित राहून क्षेत्रिय कर्मचा-यांना आणि ग्रामस्थांना मार्गदर्शन करणे.
- गावाचा सविस्तर प्रकल्प आराखडा (**DPR**) तयार करतांना कृतिशील सहभाग घेणे.
- तयार केलेले सविस्तर प्रकल्प अहवाल(**DPR**) मंजूरीसाठी सादर करणे.
- मंजूर सविस्तर प्रकल्प अराखडयानुसार विविध बाबींची अंमलबजावणी वेळेवर करण्यासाठी बाब निहाय अंमलबजावणीचे वेळापत्रक तयार करणे व त्यानुसार प्रत्यक्ष कार्यवाही करणे.
- या घटकाचे सुरवातीपासून व्हिडीओ शूटिंग व फोटोग्राफी करणे व सदर घटकाची (**Documentation & Success story** ) यशोगाथा तयार करणे.
- प्रकल्प अंमलबजावणीनुसार लाभ दिलेल्या लाभार्थी माहितीच्या नोंदवहया व आवश्यक अभिलेख जतन करणे.
- विहीत प्रपत्रातील मासिक अहवाल वरिष्ठ कार्यालयास समयमर्यादेत सादर करणे.

**१२.३ उपविभागीय कृषि अधिकारी हे कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) प्रकल्प समन्वयक (PC) म्हणून काम पहातील. त्यांनी उपविभागात निवड केलेल्या प्रकल्पाची अंमलबजावणी, सनियंत्रण आणि पर्यवेक्षण करावे.संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करावे.**

**१२.४ जिल्हास्तरावर या घटकाच्या समन्वयाची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांची राहील. त्यांनी पुढील प्रमाणे जबाबदारी पार पाडावी**

- सविस्तर प्रकल्प अराखडे तयार करण्यासाठी क्षेत्रीय कर्मचा-यांना मार्गदर्शन करणे आणि इतर विभागाच्या योजनाचा समावेश करण्याबाबत जिल्हास्तरीय अधिका-यांशी समन्वय ठेवणे.
- प्राप्त सविस्तर प्रकल्प आराखडयांची छाननी करुन जिल्हास्तरीय अभियान समिती (DMC) च्या मान्यतेसाठी सादर करणे.
- मंजूर सविस्तर प्रकल्प आराखडयानुसार जिल्हयातील प्रकल्पांच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक तयार करणे आणि त्यानुसार अंमलबजावणी करण्याबाबत संनियत्रण करणे.
- या घटकांतर्गत आयोजित करावयाची प्रशिक्षणे, क्षेत्रीय भेटी याविषयी नियोजन करुन वेळेत अंमलबजावणी करावी.
- जिल्हास्तरावरील नोंदवहया आणि अभिलेख अद्ययावत ठेवणे.
- विहीत प्रपत्रातील नियतकालीक अहवाल वरिष्ठ कार्यालयास समय मर्यादेत सादर करणे.
- प्रकल्प अंमलबजावणीनुसार लाभ दिलेल्या लाभार्थी माहितीच्या नोंदवहया व आवश्यक अभिलेख जतन करणे.

**१२.५ विभाग स्तरावर या घटकाचे संपूर्ण समन्वयन विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करावयाचे असून त्यांनी पुढील प्रमाणे जबाबदा-या पार पाडाव्यात.**

- विभाग स्तरावरुन सविस्तर प्रकल्प आराखडे तयार करण्याबाबत क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांना मार्गदर्शन करणे.
- प्राप्त सविस्तर प्रकल्प आराखडयांची तपासणी करुन ते विभागीय कृषि सहसंचालक यांच्या अवलोकनार्थ सादर करणे.

- विभागातील सर्व जिल्हानिहाय आराखड्यांचे संकलन करून त्याचा गोषवारा कृषि आयुक्तालयास सादर करणे.
- मंजूर सविस्तर प्रकल्प आराखडयानुसार विभागातील प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यक्रमाची समयबध्द आखणी करणे व त्यानुसार प्रत्यक्ष कार्यवाहीचे संनियत्रण करणे.
- अभियानासंबंधी विभाग स्तरावरील नोंदवहया आणि अभिलेख अद्ययावत ठेवणे.
- विहीत प्रपत्रातील नियतकालीक अहवाल वरिष्ठ कार्यालयास समय मर्यादित सादर करणे.
- अभियानातील विविध घटकांसाठी दिलेल्या अनुदानाचे वित्तीय संनियत्रण व पर्यवेक्षण करणे.
- प्रकल्प अंमलबजावणीनुसार लाभ दिलेल्या लाभार्थी माहितीच्या नोंदवहया व आवश्यक अभिलेख जतन करणे.

**१३. कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) अंमलबजावणी करीता सर्वसाधारण सूचना :-**

१३.१ कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) या घटकांतर्गत, शेतक-यांची क्षमता बांधणी करण्यासाठी आयोजित करावयाचे प्रशिक्षण कार्यक्रम, क्षेत्रिय भेटी, वाचन साहित्य तयार करणे इ. बाबींसाठी आत्मा संस्था, कृषि विद्यापीठे , कृषि विज्ञान केंद्रे यांचा सहभाग घ्यावा.

१३.२ कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) घटकांतर्गत देय अनुदानाची रक्कम धनादेश/आरटीजीएस द्वारे लाभधारकाचे बँक खात्यावर जमा करावी.

१३.३ कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) घटकांतर्गत जिल्हयांना जिल्हानिहाय वितरीत केलेल्या निधीचा तपशील उदा.उपयोगिता प्रमाणपत्र, मासिक प्रगती अहवाल मुदतीत पाठविण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील.

१३.४ या कार्यक्रमाची परिणामकारकता तपासणीसाठी विविध घटकांच्या अंमलबजावणी पुर्वीचे आणि नंतरचे फोटो / व्हिडिओ शुटींग करण्यात यावे.

१३.५ **कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD)** या घटकाची प्रभावी अंमलबजावणी करून त्याचा लाभ सर्व शेतक-यांना मिळावा यासाठी अधिका-यांनी निवडलेल्या प्रकल्पात वेळोवेळी भेटी देवून कार्यक्रमाचे संनियंत्रण व पर्यवेक्षण करावे.

१३.६ तालुका कृषि अधिकारी यांनी घटकनिहाय लाभ दिलेल्या लाभधारकांची नोंदवही कार्यालयात जतन करावी, त्यामध्ये लाभधारकाचे नांव, गांव, पत्ता, ८-अ प्रमाणे एकूण क्षेत्र, लाभ देण्यात आलेला घटक, ाटकाची अंदाजपत्रकीय रक्कम, घटकासाठी निश्चित करण्यात आलेल्या अनुदान प्रमाणानुसार देण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम तसेच अनुदानाची रक्कम ज्या स्वरुपात देण्यात आलेली आहे त्याचा तपशील (उदा.अनुदान लाभधारकाच्या खात्यावर जमा केले असल्यास बँकेचे नांव, खाते क्रमांक, रक्कम जमा केल्याचा दिनांक,अनुदानाची रक्कम इ.) इ.नोंदी घेण्यात याव्यात.

**१४. लाभधारकांची यादी प्रसिध्द करणे :**

कोरडवाहू शेती अभियानांतर्गत देण्यात आलेल्या लाभधारकांची यादी तालुका/पंचायत कार्यालये/जिल्हाधिकारी कार्यालयात लावण्यात यावी तसेच ती यादी कृषि विभागाच्या संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करण्यात यावी.

**१५. तपासणी :** योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने विहीत **परिशिष्ट-७अ** नमुन्यात खालील प्रमाणात तपासणी करण्यात यावी.

| अ. क्र. | पदनाम | तपासणीची टक्केवारी |
|---|---|---|
| १. | विभागीय कृषि सह संचालक व त्यांचे कार्यालयातील अधिक्षक कृषि अधिकारी | ०.५ टक्के |
| २. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | १ टक्के |
| ३. | उपविभागीय कृषि अधिकारी | ३ टक्के |
| ४. | तालुका कृषि अधिकारी | १० टक्के |
| ५. | मंडल कृषि अधिकारी | २५ टक्के |
| ६. | कृषि पर्यवेक्षक | १०० टक्के |

तपासणीचा अहवाल सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-७ब** मध्ये कृषि आयुक्तालयास दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करावा. प्रत्येक तालुक्यात सर्व बाबींची समप्रमाणात तपासणी करण्यात यावी.

**१६.** कृषि आयुक्तालयाचे परिपत्रक जा.क्र. कृषि/१६सीबीसेल/लाभार्थी/४७०/२०१२, दिनांक १२/०३/२०१२ नुसार ज्या प्रकरणी अनुदान वजा जाता लाभार्थी हिश्श्याची रक्कम वसूल

करावयाची आहे तेथे ती संबंधितांकडून रोख अथवा डी.डी. स्वरुपात वसूल करुन या रकमेची लाभार्थ्यांना शासकीय जमा पोचपावती देण्यात यावी. तसेच वसूल केलेली रक्कम अथवा डी.डी. तात्काळ संबंधित कर्मचा-यांनी त्यांच्या कार्यालयातील रोखपालाकडे जमा करावी. रोखपालाने या रकमेची नोंद रोखवही मध्ये घेवून कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिका-यांच्या बँक खात्यात त्वरीत जमा करावी. याप्रमाणे कार्यवाही न केल्यास, ती वित्तीय अनियमितता समजून संबधीत मागणी नोंदविणा-या अधिका-या विरुध्द प्रशासकीय कारवाई केली जाईल. लाभार्थी हिश्यासह पुरवठा संस्थेची देयके अदा करणे, ही मागणी नोंदविण्या-या अधिका-याची सर्वस्वी जबाबदारी राहील.

**१७. अनुदानाची द्विरुक्ती :-** कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) घटकांतर्गत अंतर्भूत असलेल्या बाबीसाठी अनुदान देण्यात येत आहे. इतर योजनेमधूनही या बाबींसाठी अनुदान देण्याची तरतूद आहे. तेव्हा लाभार्थीस एकाच बाबीसाठी दोन योजनेमधून अनुदान दिले जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

**१८. अभिलेख व्यवस्थापन :-**

१८.१ **कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD)** करीता लेखे वेगळे ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार सर्व स्तरावर खालीलप्रमाणे लेखा/हिशोब पुस्तके ठेवणे आवश्यक आहे.

(१) **रोज किर्द (Cash Book)**

(२) **खतावणी (Ledger)**

(३) **धनादेश नोंदवही (Cheque Register ) – कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD)** करीता अनुदानाची अदायगी धनादेशाव्दारे संबंधितांच्या बँक खात्यावर जमा करावयाची असल्याने सर्व संबंधित कार्यालयाने निधी वितरणासाठी किंवा इतर खर्चासाठी पारित केलेल्या धनादेशांच्या संपूर्ण तपशीलांच्या एकत्रित नोंदी ठेवाव्यात.

